**ठळक बातम्या**

- देशभरात आजपासून घरोघरी तिरंगा अभियान सुरू, अभियानात मोठ्या संख्येनं सहभागी होण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन
- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आजपासून ३ दिवसांच्या मालदीव दौऱ्यावर
- कोल्हापूरातल्या संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला लागलेल्या आगीत रंगमंच जळून खाक

**आणि**

- पॅरिस ऑलिम्पिकमधल्या कामगिरीसाठी हॉकी संघ आणि भालाफेकपटू नीरज चोप्रावर अभिनंदनाचा वर्षाव

**<><><><><>**

आगामी स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर, नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना जागृत करण्यासाठी आज, ऑगस्ट क्रांती दिन ते १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्य दिनापर्यंत देशभरात हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान राबवण्यात येणार आहे.

या मोहीमेला पुन्हा एकदा लोकचळवळ बनवण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशाद्वारे केलं आहे. तिरंग्याच्या सन्मानासाठी नागरिकांनी आपल्या घरावर फडकवलेल्या तिरंग्याचा फोटो हर घर तिरंगा संकेतस्थळावर टाकावा असं आवाहनही त्यांनी केलं आहे. तसंच स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी आपल्या समाजमाध्यम हँडलवर तिरंग्याचं चित्र लावलं.

यावर्षी या अभियानादरम्यान देशभरात सुमारे दोनशे सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून, येत्या १३ ऑगस्ट रोजी दिल्लीत खासदार आणि

केंद्रीय मंत्र्यांचा सहभाग असलेली तिरंगा बाईक रॅली काढण्यात येणार आहे, अशी माहिती केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंग शेखावत यांनी काल वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा हे अभियान, स्वातंत्र्यसैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी केलेल्या त्याग आणि बलिदानाची जाणीव करून देईल. या अभियानाने लोक चळवळीचं स्वरुप धारण केलं असून यावर्षी राज्यातल्या अडीच कोटी घरांवर तिरंगा फडकावला जाणार असल्याचं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितलं. मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून घरोघरी तिरंगा अभियानाला मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरुवात झाली, त्यावेळी ते बोलत होते. या अभियानात जनतेनं मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी यावेळी केलं.

**दरम्यान,** घरोघरी तिरंगा अभियानाला राज्यात विविध ठिकाणी सुरुवात झाली आहे.

**धुळ्यात** आज या अभियानाचा प्रारंभ जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते झाला. यावेळी एक बाईक रॅली देखील आयोजित करण्यात आली होती.

**वाशिम** शहरातही सायकलरॅली काढण्यात आली. निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी हिरवा झेंडा दाखवून या रॅलीला रवाना केलं. या रॅलीत राष्ट्रीय छत्र सेनेचे विद्यार्थी आणि सायकलप्रेमी मोठ्या संख्येनं सहभागी झाले होते.

**<><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाजमाध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी अभिनेत्री प्रिया बेर्डे म्हणाल्या…

**बाईट - प्रिया बेर्डे**

**<><><><><>**

ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या भारत छोडो आंदोलनात भाग घेतलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहिली. हा स्वातंत्रलढ्याच्या चळवळीला  कलाटणी देणारा महत्वपूर्ण दिवस, असं प्रधानमंत्र्यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.  देश भ्रष्टाचार, घराणेशाही आणि तुष्टीकरण यापासून मुक्त असावा ही भावना या चळवळीच्या माध्यमातून दृढ झाल्याचं प्रधानमंत्र्यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यसभेत आज काँग्रेस, द्रमुक, तृणमूल काँग्रेस, राष्ट्रीय जनता दलासह सर्व विरोधी पक्ष सदस्यांनी समाजवादी पार्टीच्या नेत्या जया बच्चन यांच्या टिप्पणीवर सदनात सुरु असलेल्या गदारोळात सभात्याग केला. शून्य प्रहारानंतर राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या विरुद्ध भाजपा सदस्य घनश्याम तिवारी यांनी केलेल्या आक्षेपार्ह टिप्पणीवर बोलत असताना जया बच्चन यांनी टिप्पणी केली आणि त्यानंतर सदनात गदारोळ सुरु झाला. त्यामुळे राज्यसभेचे कामकाज आधी दुपारी अडीच आणि नंतर ३ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आज मालदीवच्या ३ दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. दोन्ही देशांमधले परस्पर संबंध आणखी दृढ करण्याच्या नव्या संधी

शोधणं हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे. हिंद महासागर क्षेत्रात महत्वपूर्ण सामरिक भौगोलिक स्थान असलेला मालदीव हा भारताचा प्रमुख शेजारी देश आहे.

**<><><><><>**

देशाच्या खनिज उत्पादनात वाढ झाली असून २०२४-२५च्या पहिल्या तिमाहीत लोह खनिज उत्पादनात सुमारे ९ पूर्णांक ७ दशांश टक्के  टक्के वाढ नोंदली गेली.  चुनखडीच्या उत्पादनात १ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ नोंदली गेली. तर चुनखडीचं उत्पादन साडेचारशे मेट्रिक टन झालं होतं. मँगनीज उत्पादन ११ टक्क्यांनी वाढलं आहे.

**<><><><><>**

वाहनांसाठी सुटे भाग बनवणाऱ्या उद्योगांनी  चालू आर्थिक वर्षात ६ लाख १४ हजार कोटी रुपायांची उलाढाल नोंदवली. वर्ष २ हजार २३ मध्ये ही आकडेवारी ५ लाख ५९ हजार कोटी रुपये इतकी होती. वाहन उत्पादनात झालेले वाढ आणि विक्रीमध्ये झालेली वृद्धी यामुळे सुट्या भागांची मागणी वाढली आणि त्यातून ही वाढ झाल्याचं ऑटोमोटिव्ह कंपोनंट्स मॅन्युफॅक्चरर्स असोसिअसं ऑफ इंडिया यांनी सांगितलं.

**<><><><><>**

कोकण रेल्वेच्या मार्गाच्या दुपदरीकरणाच्या प्रस्तावाला मंजुरी देण्याबाबत लवकरच संबधित राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची संयुक्त बैठक घेण्याचं आश्वासन केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिलं आहे. कोकण रेल्वेच्या मार्गाचं दुपदरीकरण करावं या मागणीसाठी खासदार रवींद्र वायकर यांनी वैष्णव यांना काल निवेदन दिलं होतं. कोकण रेल्वेच्या मार्गावरून दरवर्षी सुमारे ३ कोटी पेक्षा जास्त प्रवासी प्रवास

करतात. मात्र, या मार्गावर एकच ट्रॅक असल्यानं प्रवाशांची गैरसोय होते. त्यामुळे कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणाच्या प्रस्तावाला मंजुरी द्यावी अशी मागणी या निवेदनातून केली आहे.

**<><><><><>**

कोल्हापूरातल्या ऐतिहासिक संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहाला काल रात्री आग लागली. या आगीमुळे जीवितहानी झाली नाही, मात्र आगीत नाट्यगृहाचा रंगमंच जळून खाक झाला. नाट्यगृहाचा काही भाग तसंच छतही कोसळलं आहे. शॉर्टसर्किटमुळे आग लागल्याचं सांगण्यात येत आहे. नाट्यगृहाचा बहुतांश भाग लाकडाचा असल्यामुळे आग भराभर पसरली. केशवराव भोसले यांची आज १३४ वी जयंती आहे, या दिवसाच्या पूर्वसंध्येलाच अशी घटना घडल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, हे नाट्यगृह नव्याने उभारण्यासाठी शासन स्तरावर प्रयत्न करू अशी ग्वाही कोल्हापूरचे पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी आज दिली. त्यांनी आज दुर्घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. राजर्षी शाहू महाराजांनी रोममधल्या नाट्यगृहाच्या धर्तीवर बांधलेलं हे नाट्यगृह म्हणजे कोल्हापूरचा सांस्कृतिक ठेवा आहे असं सांगून नाट्यगृहाच्या बांधणीसाठी आणि त्याला पूर्वीचं वैभव प्राप्त करुन देण्यासाठी शासनस्तरावर निधी मिळवण्याचा प्रयत्न करु, असंही मुश्रीफ यांनी सांगितलं. आगीच्या घटनेची चौकशी होईल असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

राज्यात अनेक ठिकाणी आज नागपंचमीचा सण उत्साहात साजरा होत आहे. या दिवशी वारुळाची देखील पूजा केली जाते. सापांविषयी समाजामध्ये पसरलेल्या

विविध गैरसमजांबाबत, अनेक सर्पमित्र नागपंचमीच्या निमित्तानं जनजागृती करत असतात.

नागपंचमी निमित्त धुळे जिल्ह्यातल्या निमगुळ इथं आज अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने सापासंदर्भात भित्तीचित्रकाद्वारे जनजागृती करण्यात आली. नागपंचमीसाठी प्रसिद्ध असलेल्या सांगलीतल्या बत्तीसशिराळ्यात प्रतिकात्मक पद्धतीनं नागपंचमी साजरी होत आहे.

**<><><><><>**

**हिंगोली** जिल्ह्यात जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. हिंगोली शहरातल्या क्रांतीसूर्य बिरसा मुंडा चौक इथं मान्यवरांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केला, यावेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

**गडचिरोली**तही आदिवासी दिनानिमित्त रॅली काढण्यात आली.

**<><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकच्या कालच्या दिवशी भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रा यानं रौप्यपदकावर नाव कोरलं, तर पुरुष हॉकी संघानं कांस्यपदकाला गवसणी घातली. या कामगिरीबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नीरज चोप्राचं कौतुक केलं आहे. संपूर्ण देशाला नीरजचा अभिमान आहे आणि त्याच्या कामगिरीमुळे येणाऱ्या कित्येक पिढ्यांना प्रेरणा मिळेल, अशा शब्दांत राष्ट्रपतींनी त्याची प्रशंसा केली. नीरजनं नेहमीच त्याची प्रतिभा दाखवून दिली आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. त्याच्या कामगिरीमुळे तिरंगा ध्वजाचा मान वाढल्याची प्रतिक्रिया गृहमंत्री अमित शाह यांनी दिली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी कास्यपदक विजेत्या हॉकी संघाचंही अभिनंदन केलं. भारतीय हॉकीला पुनरुज्जीवित केल्याचं मोठं श्रेय या संघाला जातं, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही संघाचं अभिनंदन केलं. जागतिक मंचावर त्यांनी भारताचं नाव उंचावल्याचं ते म्हणाले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल संघातल्या हॉकीपटूंशी फोनवरून संवाद साधला आणि त्यांचं अभिनंदन केलं. या संघाच्या सन्मानार्थ प्रत्येक हॉकीपटूला प्रत्येकी १५ लाख रुपये आणि त्यांच्यासोबतच्या चमूला प्रत्येकी साडेसात लाख रुपये देण्याची घोषणा हॉकी इंडियानं केली आहे. लोकसभेतही आज नीरज चोप्रा आणि हॉकी संघाचं अभिनंदन करण्यात आलं. ही ऐतिहासिक कामगिरी अनेक युवांना प्रेरणा देईल, असं लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे.

**//<><><><><>//**